सन २०१४-२०१५ या वर्षाकरीता राज्यातील शासकीय धान्य गोदामांना लागणाऱ्या सुतळी गाठींचा पुरवठा करण्यासाठी ई-निविदा काढण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग,

शासन शुद्धीपत्रक क्रमांक : सामुग्री-३११४/ प्र.क्र. १३४ /२/ ना.पु. १६-अ,

मंत्रालय विस्तार, मुंबई- ४०० ०३२.

दिनांक : २७ जानेवारी, २०१६.

वाचा : (१) शासन निर्णय समक्रमांक दि. २२ डिसेंबर, २०१५.

(२) संचालक, नागरी पुरवठा, पुरवठा आयुक्त कार्यालय, मुंबई यांचे पत्र क्र. पुआका-२०१६/ सुतळी गाठी पुरवठा/ ई-निविदा/ प्र.क्र.१०७०/ कक्ष- ७, दि. १८ जानेवारी, २०१६

प्रस्तावना :

संदर्भ क्र.१ येथील शासन निर्णयान्वये सन २०१४-१५ या वर्षाकरीता, राज्यातील ३३ जिल्हयातील शासकीय गोदामांमध्ये अन्नधान्याचे प्रमाणिकरण करण्यासाठी एकूण १५,१८८ सुतळी गाठींची खरेदी करण्यासाठी ई-निविदा पध्दती राबविण्यासाठी ई-निविदा प्रक्रिया कार्यान्वित करण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत. ही निविदा प्रक्रिया राबविण्याची जबाबदारी संचालक, नागरी पुरवठा, पुरवठा आयुक्त कार्यालय यांचेकडे सोपविण्यात आलेली आहे. उद्योग, उर्जा व कामगार विभागाच्या दि.३० ऑक्टोबर, २०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये नवीन खरेदी धोरणानुसार निविदा प्रक्रिया राबविताना या शासन निर्णयातील काही तरतूदींमध्ये सुधारणा करण्याची आवश्यकता असल्याची बाब त्यांनी संदर्भ क्र. २ येथील पत्रान्वये विभागाच्या निदर्शनास आणून दिलेली आहे. त्यानुसार उपरोक्त संदर्भ क्र. १ येथील शासन निर्णयामध्ये पुढीलप्रमाणे सुधारणा करण्याची बाब विचाराधीन होती.

शासन शुद्धीपत्रक :

संदर्भ क्र. १ येथील दि.२२ डिसेंबर, २०१५ रोजीच्या शासन निर्णयातील पुढील परिच्छेद सुधारित करण्यात येत आहेत :

(६) (ii) इसाऱ्याची रक्कम ऑनलाईन भरता येईल. इसाऱ्याची रक्कम निविदा सादर करण्यापूर्वी ऑनलाईन भरून त्याचा तपशील निविदेमध्ये नमूद करण्यात यावा तसेच पावतीची प्रत निविदेसोबत सादर करण्यात यावी. सुक्ष्म व लघु, मध्यम उद्योग अधिनियम-२००६ अंतर्गत उत्पादक म्हणून नोंदणीकृत असलेल्या सुक्ष्म व लघु उत्पादक उद्योगांना व मध्यवर्ती भांडार खरेदी संघटना यांचेकडे नोंदणी झालेल्या उत्पादक पुरवठादारांना निविदा शुल्क व इसारा रक्कम भरण्यापासून, सुट देण्यात आलेली आहे, त्यांनी सुट दिल्याबाबतचे प्रमाणपत्र सादर करावे.

(७) (i) ज्या निविदाकाराची निविदा मंजूर केली आहे त्या निविदाकारास उद्योग उर्जा व कामगार विभागाच्या दि.३० ऑक्टोबर, २०१५ रोजीच्या शासन निर्णयासोबतच्या नियमपुस्तिकेतील परिच्छेद क्र.४.६ मधील तरतूदीनुसार रक्कम प्रतिभूती ठेव म्हणून करारनाम्यासोबत धनाकर्षाद्वारे वित्तीय सल्लागार व उपसचिव यांचे नावे जमा करावी लागेल.

(८) (viii) तांत्रिक लिफाफा "अ" मध्ये पात्र ठरलेल्या निविदाकारांनी ते पुरवठा करु इच्छिणाऱ्या सुतळी गाठींचा नमुना गुणनियंत्रणासाठी संचालक, नागरी पुरवठा, पुरवठा आयुक्त कार्यालय यांना उपलब्ध करुन द्यावा. यापैकी आयएसआय समांतर दर्जा असलेल्या सुतळी गाठींचे नमुने संचालक, नागरी पुरवठा यांनी उद्योग ऊर्जा व कामागार विभागाच्या शासन निर्णय दि. ३० ऑक्टोबर, २०१५ सोबतच्या परिशिष्ट क्रमांक १५ मध्ये दिलेल्या त्रयस्थ संस्थेकडे मालाच्या दर्जाविषयक तपासणीसाठी पाठवावेत. या संस्थेकडून प्राप्त अहवालामध्ये पात्र ठरलेल्या निविदाकारांचा दरांचा लिफाफा 'ब' उघडण्यात यावा.

(xv) तांत्रिक लिफाफा 'अ' उघडल्यानंतर ३ पेक्षा कमी ग्राह्य निविदा प्राप्त झाल्यास, दराचा लिफाफा 'ब' उघडण्यात येऊ नये व निविदेच्या अल्प प्रतिसादामुळे निविदा सादर करण्यास पुन्हा एक आठवड्याची पहिली मुदतवाढ देण्यात यावी. यावेळीही ३ पेक्षा कमी ग्राह्य निविदा प्राप्त झाल्यास, निविदा सादर करण्यास पुन्हा एक आठवड्याची दुसरी मुदतवाढ देण्यात यावी. या मुदतवाढीनंतरही ३ पेक्षा कमी ग्राह्य निविदा प्राप्त झाल्यास, निविदा उघडणाऱ्या अधिकाऱ्याने म्हणजे संचालक, नागरी पुरवठा, मुंबई यांनी त्यांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसमोर (प्रशासकीय विभाग) "दराचा" लिफाफा 'ब' उघडावा व त्यावर वरिष्ठ अधिकाऱ्यांची स्वाक्षरी घेऊन स्वतंत्रपणे निर्णय घ्यावा.

(xvii) जीवनावश्यक वस्तू अधिनियम, १९५५ खालील सुतळी गाठींच्या पुरवठ्याच्या अनुषंगाने पुरवठादारांविरुध्द गुन्हा दाखल होऊन दंड अथवा शिक्षा झालेल्या व्यक्ती, कंपन्या, भागीदारी संस्था, सहकारी संस्था, अधिकृत वितरक यांना शिक्षेच्या कालावधीत निविदेत भाग घेता येणार नाही. अशा रीतीने गुन्हा दाखल होऊन दंड अथवा शिक्षा झाली नसल्याबाबतचे शपथपत्र निविदेसोबत नोटराईज्ड केलेल्या रु.१००/- च्या गैरन्यायिक मुद्रांक पेपरवर घेण्यात यावे.

(xxi) तांत्रिक लिफाफा "अ" मध्ये सादर करावयाच्या कागदपत्रांची यादी परिशिष्ट-अ मध्ये दिलेली आहे.

(१४) कंत्राटदाराकडून डिलीव्हरी घेताना संबंधित गोदामपाल / गोदाम व्यवस्थापक यांनी सुतळीगाठीवर उत्पादकाचे चिन्हांकन, उत्पादन दिनांक तसेच "आय.एस.आय." मार्क क्र. १९१२/१९८४ (व्हरायटी क्र.२) व आय.एस.आय. चिन्हांकित समांतर दर्जा (आवेष्टना व्यतिरिक्त ६० कि.ग्रॅ. वजनाची गाठ)असल्याबाबत खातरजमा करावी. त्यासाठी डिलीव्हरी घेताना प्राप्त झालेल्या सुतळी गाठींचे नमुने जिल्हा पुरवठा अधिकारी / सहाय्यक जिल्हा पुरवठा अधिकारी यांचेसमक्ष काढून घेऊन त्यांची तपासणी उद्योग ऊर्जा व कामगार विभागाच्या शासन निर्णय

दि. ३० ऑक्टोबर, २०१५ सोबतच्या परिशिष्ट क्रमांक १५ मध्ये दिलेल्या त्रयस्थ संस्थेकडे करण्यात यावी. सदर प्रमाणपत्राच्या प्रतीसह देयके सादर करण्यात यावीत.

(१६) कंत्राटदाराने डिलीव्हरी दिल्यानंतर, डिलीव्हरी चलनावर माल ताब्यात घेणा-या गोदामपाल/ गोदाम व्यवस्थापक यांच्या सही शिक्क्यानंतर तहसिलदार यांनी त्यावर प्रती स्वाक्षरी व शिक्का मारुन डिलीव्हरी चलन संचालक, नागरी पुरवठा, पुरवठा आयुक्त कार्यालय, मुंबई यांचेकडे सादर करावे. डिलीव्हरी सुस्थितीत प्राप्त झाल्याचे तहसिलदार/ जिल्हापुरवठा/ अन्नधान्य वितरण अधिकारी यांची योग्यता प्रमाणपत्रे **तसेच मालाच्या दर्जाबाबत विहित संस्थांची प्रमाणपत्रे** यांची तपासणी पुरवठा आयुक्त कार्यालयाने करावी.

डिलीव्हरी सुस्थितीत प्राप्त झाल्याबाबत तहसिलदार/ जिल्हा पुरवठा अधिकारी / अन्नधान्य वितरण अधिकारी यांचेकडून प्राप्त झालेल्या योग्यता प्रमाणपत्रांची तपासणी करून त्याअनुषंगाने पुरवठा आयुक्त कार्यालयाने मुळ प्रमाणकाच्या पाठीमागे प्रमाणपत्र देणे आवश्यक राहील. तसेच मुळ देयकाच्या मागे प्रदानार्थ आदेश देण्यात यावा.

(२०) याकामी येणारा खर्च हा अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाच्या वित्तीय सल्लागार व उप सचिव, महाराष्ट्र शासन यांचे वैयक्तिक ठेव लेख्यामधून "४४०८ अन्न साठवणूक व वखार साठवणूक व वखार साठवण यावरील भांडवली खर्च ०१-अन्न (१०१) प्रापण व पुरवठा (०२) (००) प्रापण वितरण व किंमत नियंत्रण (०२) (०५) मुंबई शहर अन्नधान्य खरेदीवरील अनुषंगिक खर्च (४४०८ ०२६४) मागणी क्रमांक एम-४ या लेखाशिर्षा खाली खर्ची टाकण्यात यावा व ज्या वित्तीय वर्षामध्ये प्रत्यक्ष खरेदी करण्यात येईल त्याच वित्तीय वर्षाच्या मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

(२३) सदर शासन शुद्धीपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०१६०१२७१७५४३०३१०६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SATISH SHRIDHAR SUPE

Digitally signed by SATISH SHRIDHAR SUPE
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=FOOD CIVIL SUPPLY AND CONSUMER PROTECTION, postalCode=400032, st=Maharashtra, cn=SATISH SHRIDHAR SUPE
Date: 2016.01.27 17:58:12 +05'30'

(सतिश श्रीधर सुपे)
उप सचिव

प्रति,

१) मा.मंत्री, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण यांचे खाजगी सचिव
२) मा.राज्य मंत्री, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण यांचे खाजगी सचिव

३) प्रधान सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
४) विकास आयुक्त(उद्योग), उद्योग संचालनालय, मंत्रालय, मुंबई.
५) सर्व विभागीय आयुक्त,
६) नियंत्रक, शिधावाटप व संचालक, नागरी पुरवठा, मुंबई.
७) संचालक, नागरी पुरवठा, पुरवठा आयुक्त कार्यालय, मुंबई सर्व उपायुक्त (पुरवठा),
८) सर्व जिल्हाधिकारी (मुंबई व मुंबई उपनगर जिल्हा वगळून)
९) विभागीय आयुक्त, कार्यालय
१०) सर्व जिल्हा पुरवठा अधिकारी
११) उपसंचालक, नागरी पुरवठा, पुरवठा आयुक्तांचे कार्यालय, मुंबई.
१२) उप संचालक, नागरी पुरवठा (गो/वा), मुंबई.
१३) वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई.
१४) महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१, मुंबई.
१५) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१, मुंबई.
१६) महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र-२, नागपूर.
१७) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-२, नागपूर.
१८) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, नागरी पुरवठा, लेखा परीक्षा परिमंडळ द्वारा: वित्तीय सल्लागार व उप सचिव, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई.
१९) वित्त विभाग (व्यय ४), मंत्रालय, मुंबई.
२०) उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय,मुंबई.
२१) निवड नस्ती/नापु-१६अ.

(अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, शासन शुद्धीपत्रक क्रमांक : सामुग्री-३११४/प्र.क्र.१३४/२/ना.पु.१६अ, दिनांक : २७ जानेवारी, २०१६ सोबतची सहपत्रे)

परिशिष्ट - अ

लिफाफा "अ" मध्ये (तांत्रिक लिफाफा) सादर करावयाच्या कागदपत्रांच्या सूचीतील परि.क्र.२ पुढीलप्रमाणे सुधारण्यात येत आहे.

अ.क्र.	कागदपत्रांची सूची
२	जीवनावश्यक वस्तू अधिनियम,१९५५ खालील सुतळी गाठींच्या पुरवठ्याच्या अनुषंगाने पुरवठादारांविरुध्द गुन्हा दाखल होऊन दंड अथवा शिक्षा झाली नसल्याबाबतचे शपथपत्र निविदेसोबत नोटराईज्ड केलेल्या रु.१००/- च्या गैरन्यायिक मुद्रांक पेपरवर घेण्यात यावे.

परिशिष्ट-क

वितरक प्रमाण पत्राचा नमुना पुढीलप्रमाणे सुधारण्यात येत आहे.

Distributorship certificate

To whom so ever it may concerned

This is to certify that M/s.---

Address ---

are appointed as our authorized Distributor for sale and supply of our product country Jute twine for the state of Maharashtra

Place- Signature

Date- Propritor/ Partner/ Distributor

with seal.